

## २८. कोणासाठी ?... बाळासाठी !

गोष्ट आहे शिवाजी महाराजांच्या वेळची. रायगडावर घडलेली. तो दिवस होता कोजागरी पौर्णिमेचा. रायगडावर मोठा समारंभ होता. गवळी दूध घेऊन गडावर चालले होते. काही गवळणीही निघाल्या होत्या.

गडाखाली एक छोटे गाव होते. त्या गावात हिरा नावाची एक गवळण राहत होती. तिलाही आज दूध घेऊन गडावर जायचे होते. धारा काढल्या होत्या. चरव्या दुधाने भरून ठेवल्या होत्या; पण बाळ झोपल्याशिवाय तिला बाहेर पडता येत नव्हते.

तेवढ्यात एक गवळण तिथे आली. ती हिराला म्हणाली, "अग, झाले की नाही तुझे ? चल ना."

हिरा म्हणाली, "तू हो पुढे. अजून माझे तान्हे झोपायचे आहे. त्याला झोपवते आणि मग मी निघते."

हिराला बोलवायला आलेली गवळण पुढे निघून गेली. हिराने बाळाला पाळण्यात घातले. बराच वेळ ती झोके देत उभी राहिली. अखेर एकदाचे तिचे बाळ झोपले. मग दुधाने भरलेल्या चरव्या घेऊन हिरा घराबाहेर पडली. निघण्यापूर्वी शेजारच्या आजीला ती म्हणाली, "जरा बाळाकडे बघा.

झोपलाय तो. एवढे दूध गडावर विकून दिवस मावळायच्या आत येतेच."

निघायला आधीच उशीर झाला होता. झपाझप पावले टाकत ती गड चढू लागली. ती गडावर पोहोचली तेव्हा इतरांनी आपले सगळे दूध विकले होते. विकत घेणारेही कोणी दिसत नव्हते. दूध विकायला बराच वेळ लागला. दिवस केव्हा मावळला हे तिच्या लक्षातही आले नाही. दिवस मावळलेला पाहून तिच्या मनात आले — गडाचे दरवाजे बंद तर झाले नसतील? दरवाजे बंद झाले तर घरी कसे जाता येईल? मी घरी गेले नाही तर घरातल्या बाळाची काळजी कोण घेईल?




बाळाच्या ओढीने ती घाईघाईने निघाली. मुख्य दरवाजाशी ती आली. गडाचा दरवाजा बंद झाला होता. लगेच ती चौकीदाराकडे गेली. त्याला कळवळून म्हणाली, "बाबा, मी हात जोडते. दरवाजा उघडा. मला घरी जाऊ दया. माझे बाळ घरी एकटेच आहे."

चौकीदार म्हणाला, "मला दरवाजा उघडता येणार नाही. गडावरचे दरवाजे दिवस मावळायला बंद होतात; आणि ते

दिवस उगवायला उघडतात. महाराजांचा तसा हुकूमच आहे."

हिराने त्याची पुन्हा-पुन्हा विनवणी केली; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. काय करावे ते तिला कळेनासे झाले. कोठून खाली उतरता येईल का, याचा विचार करत ती इकडे तिकडे पाहू लागली. वाट शोधण्यासाठी ती गडावर फिरू लागली. या बुरुजाकडे जा, त्या बुरुजाकडे जा, अशी ती पुष्कळ फिरली. वाट काही दिसेना. तिच्या डोळ्यांसमोर तिचा बाळ दिसू लागला. मग मात्र तिला राहवेना. ती निघाली. काहीही करून गड उतरायचाच असे तिने ठरवले. एका कड्या-जवळ ती आली. बाळाच्या ओढीने ती कशीबशी कडा उतरू लागली.

मध्येच तिचा पाय घसरत होता. ती पडत होती; पण उठून पुन्हा गड उतरत होती. एके ठिकाणी तिचा पाय निसटला; पण झाडाच्या एका फांदीने तिला सावरले. काही झाले तरी ती थांबली नाही. अखेर एक अतिशय अवघड कडा उतरून ती खाली आली. गड उतरल्यावर तिला कोण आनंद झाला!



बाळाला भेटण्यासाठी ती धावतच सुटली.

ती घरी आली. बाळ रडत होते. आजीच्या मांडीवरून तिने बाळाला उचलून घेतले. त्याला पोटाशी धरून कुरवाळले. त्याचे पटापट पापे घेतले. आईला पाहून बाळ हसू लागले.

पुढे ही हकीकत शिवाजी महाराजांना कळली. हिराच्या या धाडसाचे त्यांनाही नवल वाटले. त्यांनी तिला बोलावून घेतले. तिला मोठे बक्षीस देऊन तिचे कौतुक केले.

हिराने हे किती मोठे धाडस केले होते! कोणासाठी? आपल्या बाळासाठी! ज्या कड्यावरून हिरा गड उतरून खाली गेली तेथे महाराजांनी एक बुरूज बांधला. तो आजही रायगडावर आहे. 'हिरकणीचा बुरूज' म्हणतात तो हाच.



**कोजागरी पौर्णिमा**–आश्विन महिन्यातील पौर्णिमा. **चरवी**–दुधासाठी वापरण्याचे वाटोळ्या आकाराचे मोठे भांडे. **चौकीदार**–पहारेकरी. **कडा**–डोंगराची कड, सुळका. **कोण आनंद होणे**–फार आनंद होणे.

**प्रश्न :**

१. रायगडावर जायला हिराला उशीर का झाला? २. दिवस मावळल्यावर तिला कशाची भीती वाटली? ३. ती चौकीदाराकडे का गेली? ४. चौकीदाराने तिला काय सांगितले? ५. गड उतरण्यासाठी तिने काय केले? ६. शिवाजी महाराजांनी तिचे कौतुक का केले? ७. 'हिरकणीचा बुरूज' असे नाव का पडले?